# वीर खेळ सूचना

हा एक असा खेळ आहे जो तुमच्या मुलांना त्यांच्या जीवनातील वास्तविक परिस्थितीत ईश्वरीय गुण कशा प्रकारे वापरावे हे समजण्यास मदत करेल. आम्ही सल्ला देतो कि हजेरी साठी बक्षीस म्हणून कार्डांचा वापर करावा, आणि मुलांना प्रत्येक आठवड्यात यायला सांगा जेणेकरून ते कार्ड जमा करू शकतील आणि एकमेकांबरोबर खेळ खेळू शकतील.

## सूचना:

प्रत्येक मुलाला प्रत्येक आठवड्यात वर्गात हजर राहून त्यांने मिळवलेले वीर आणि विशेष कार्ड द्या. आम्ही सल्ला देतो कि तुम्ही प्रत्येक कार्डच्या मागे त्या मुलाचे नाव लिहा ज्याचे ते आहे. खेळ खेळण्याकरिता, मुलं जोडीने येतील. मग खेळाच्या प्रत्येक फेरीसाठी, खालील गोष्टी करा:

- शिक्षक दिलेली परिस्थिती / प्रश्नांपैकी एक वाचतील, परंतु त्या परिस्थितीसाठी कोणते गुण आवश्यक आहे ते सांगू नका.
- खेळाडू त्या परिस्थतीत कोणत्या गुणधर्मांची आवश्यकता आहे याचा अंदाज लावतात आणि त्यांच्या कडे असलेल्या कार्डात ज्या वीरांकडे तो गुणधर्म ते शोधतात. खेळाडू जिंकण्यासाठी त्यांच्या कडे असलेले वैकल्पीक वैशिष्टय कार्ड देखील निवडू शकतात.
- जेव्हा प्रत्येक प्रतिस्पर्धी जिंकण्याची शक्यता असलेले वीर किंवा वैशिष्टय कार्ड घेवून तयार झाले कि, 3 म्हटल्या बरोबर त्यांनी त्यांचे कार्ड सरळ टेबलच्या मध्ये एकत्रित ठेवावे. टिपः खेळाच्या पहिल्या काही राउंड मध्ये मुलांना विचार करून खेळणे शिकण्यासाठी अधिक वेळ दया. नंतर त्यांना घाई करा हयासाठी कि त्यांनी पटकन निर्णय घ्यावा जेणे करून ते मनोरंजक होईल.
- ज्या खेळाडूकडे वीर कार्ड आणि वैश्ष्टिय कार्डाचे बरोबर गुणासाठी सर्वात अधिक गुण राहतील तो जिंकेल. गुणपत्रक ठेवा, आणि प्रत्येक विद्यार्थी किती फे-या जिंकतो ते पहा.
- खेळामध्ये प्रत्येक कार्ड केवळ एकदाच वापरता येईल. प्रत्येक फेरी नंतर प्रत्येक खेळाडू त्यांनी वापरलेले कार्ड घेईल अररि ते उलटे करून बाजूला ठेवील.
- मुलांचे कार्ड संपेपर्यंत आणि काही फे-या खेळा.
- जे खेळाडू सर्वात ज्यास्त फे-या जिंकेल तो जिंकेल. मुलांना वेगवेगळया प्रतिस्पध्र्याबरोबर पुन्हा खेळू दया.

## घटक 1 कार्ड

- उत्पत्ती
- हाबेल
- पवित्र शास्त्र (पेंटटेक)
- नोहा
- अब्राहाम
- इसहाक
- याकोब
- योसेफ
- मोशे
- पवित्र शास्त्र (ऐतिहासिक पुस्तकं)
- परमेश्वराची तलवार
- यहोशवा
- लपविलेले सोने



## वीर कार्डः







दोन प्रकारचे कार्ड आहेतः वीर कार्ड आणि वैशिष्टय कार्ड. वीर कार्ड पवित्र शास्त्रातील खालिल सहा पैकी एक गुण असलेली व्यक्ति दर्शविल व्यक्ति दर्शविलः सामथ्र्य, खरेपण, आज्ञापालन, नम्रता, हृदय आणि विश्वास.

प्रत्येक वीराकडे हया पैकी प्रत्येक वैशिष्टयासाठी 100 गुण आहेत जे त्यांच्या जीवनाच्या विश्लेषणातून काढलेले आहेत. जर वीराकडे एखादया क्षेत्रामध्ये स्वतःला सिध्द करण्यासाठी संधी नसली तर त्याला त्या क्षेत्रात गुण मिळणार नाहीत. दोन वीरांना सारख्याच वैशिष्टयासाठी सारखेच गुण मिळू शकत नाहीत. जर वीराने एका क्षेत्रात कमजोरी दाखविली तर त्याला दुस-या वीरापेक्षा कमी गुण मिळतील ज्याने त्या क्षेत्रात कमजोरी दाखविली नाही.

उदाहरणः आपल्याला हाबेलाच्या जीवनात जास्त विश्वास दिसत नाही म्हणून त्याला विश्वासा साठी केवळ 50 गुण मिळतील. त्याला त्याच्या आयुष्यात लवकरच ठार मारण्यात आले म्हणून त्याला शक्तीसाठी फक्त एकच गुण मिळणार. त्याला मनासाठी 90 गुण मिळतात, कारण त्याने देवाला जे खरोखर हवे होते तेच त्याने दिले आणि त्याने देवावर त्याचे प्रेम दर्शविले. आपल्या पत्नीबद्दल, ती त्याची बहिण आहे असे खोटे बोलण्या करिता अब्राहामाने प्रामाणिकपणा किंवा ह्या गुणधर्मात काही गुण गमावले आहेत. नोहाने मनाच्या गुणधर्मात काही गुण गमावले आहेत कारण अशी नोंद केल्या गेली नाही कि त्याने जलप्रलयात मारल्या जाणाऱ्या हजारो किंवा लाखो लोकांसाठी प्रार्थना केली किंवा त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मोशेजवळ नम्रतेत पूर्ण 100 अंक आहेत कारण पवित्र शास्त्र म्हणते की तो सर्वात नम्र माणूस होता. योसेफाने नम्रतेत काहीच अंक मिळविले नाहीत कारण त्याने अनावश्यक असताना देवाने त्याला दिलेल्या स्वप्नांबद्दल आपल्या भावांना सांगितले आणि जेव्हा तो मुख्य अधिकारी झाला तेव्हा आपल्याला जास्त नम्रता दिसत नाही. अब्राहामाला आज्ञाधारकपणात 97 अंक आहेत कारण त्याने देवाच्या नेतृत्वाखाली आपला देश सोडला आणि त्याने सदोम व गमोरा सोडले व आज्ञा पालन दाखविले. पण त्याला 100 अंक मिळत नाहीत कारण नोहा महान तारू बांधण्या बद्दल अधिक आज्ञाधारक होता आणि त्याने पाऊस पडण्याचे चिन्ह न दिसतांना अंदाजे 100 वर्षे काम केले.

## वैशिष्टय कार्डः







वैशिष्टय कार्ड खेळात वापरल्या जाणाऱ्या कार्ड्सचे मूल्य बदलतात. तुम्ही आणि तुमच्या प्रतिस्पर्ध्याने समान वीर निवडल्यास हे कार्डे वापरणे तुम्हाला जिंकण्यास मदत करू शकतात.

- **पवित्र शास्त्र: आपण निवडलेल्या गुणवत्तेत निर्देशित अंकाद्वारे अंक वाढवा. पवित्र शास्त्राचा तो भाग वापरण्याची खात्री करा ज्यात त्या वीरबद्दल माहिती आहे.**
- **लपविलेले सोने:** तुमच्या प्रतिस्पर्ध्याच्या वीराकडून 10 गुण कमी करा.
- **प्रार्थना:** आपल्या वीरच्या विश्वासासाठी 10 गुण जोडा.
- **कराराचा कोश:** आपल्या प्रतिस्पर्ध्याची शक्ती शून्यवर कमी करा.
- **पतनाचे झाड:** आपल्या प्रतिस्पर्ध्याची नम्रता 20 अंकांनी कमी करा.
- **निर्मिति:** ज्या फेरीत तुम्हाला असे वाटत असेल कि तुम्ही जिंकणार आहात त्या फेरीमध्ये याचा वापर करा. तुम्ही जिंकल्यास तुम्ही पूर्वी खेळलेले तीन कार्ड परत मिळवू शकता.
- **परमेश्वराची तलवार:** हे कार्ड आपोआप जिंकण्यासाठी वापरा. हे कार्ड एकटे वापरता येते.
- **परमेश्वराची अग्नि:** आपल्या प्रतिस्पर्ध्याची खेळण्याची एक पाळी टाळा.
- **कुष्ठरोगः:** फेरी हारा परंतु उर्वरित खेळासाठी आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या वीराची शक्ती 20 अंकावर कमी करा.
- **कैद:** आपली फेरी जिंकण्यासाठी हे कार्ड वापरा. आपल्या प्रतिस्पर्ध्याकडून एक यादृच्छिक वीर देखील घ्या आणि उर्वरित खेळासाठी तो अक्षम करा.

# उदाहरण फेऱ्या

या उदाहरणासाठी, मूल 1आणि मूल 2 मध्ये हे कार्ड वेगवेगळ्या आठवडी हजर राहिल्यामुळे आहेत.

मूल 1





मूल 2



## फेर 1

शिक्षक



प्रश्न: “जर तुमची बहिण तुम्हाला खोटे बोलण्यास सांगत असेल, तर कोणता वीर तुमची मदत करेल?”
आवश्यक गुणधर्म: प्रामाणिकपणा (मुलांना सांगू नका)
शिक्षक मुलांना विचार करू देण्यासाठी काही वेळ वाट पाहतील, आणि मग 3 पर्यंत मोजतील


मूल 1



1 मुलगा असा विचार करत इसहाक आणि पवित्र शास्त्र निवडतो, कि आवश्यक गुणधर्म प्रामाणिकपणा आहे.

2 मुलगा असा विचार करत अब्राहाम आणि लपविलेले सोने निवडतो, कि आवश्यक गुणधर्म विश्वास आहे.

मूल 2





नोट: त्याला पेन्ततेउच शास्त्र कार्ड निवडण्याची आवश्यकता आहे कारण इसहाकाची गोष्ट उत्पत्तित आहे.

विश्वासाचे अंक मोजल्या जाणार नाही कारण ह्या फेरीत आवश्यक गुणधर्म प्रामाणिकपणा आहे, विश्वास नाही.




इसहाक: 90 प्रामाणिकपणा
पवित्र शास्त्र: + 20 अंक
(-10 अंक)

अब्राहाम: 77 प्रामाणिकपणा
लपविलेले सोने: -10 अंक

**100 प्रामाणिकपणा**

**77 प्रामाणिकपणा**




दुसऱ्या फेरीची तयारी करीत असतांना प्रत्येक खेळाडू त्यांनी आत्ता खेळलेल्या फेरीतील कार्ड एका टाकण्याच्या ढिगात टाकतील. प्रत्येक कार्ड एका खेळात एकदाच खेळता येईल.




उरलेले कार्ड दुसऱ्या फेरी साठी उपलब्ध आहेत.

मुलाच्या कार्डच्या मागच्या बाजूला त्याचे नाव लिहा यासाठी कि ते हरवू नये.

## फेर 2

शिक्षक



प्रश्न: “तुमचा एक मित्र तुमच्याकडे येतो आणि तुम्हाला सांगतो कि तुम्ही काही तरी चुकीच करत आहात, आणि तुम्हाला माहित आहे कि तुम्ही चुकत आहात, आणि तुम्हाला त्याची जाणीव करून त्यासाठी क्षमा मागण्याची गरज आहे. कोणता वीर तुमची मदत करेल?
आवश्यक गुणधर्म: नम्रता (मुलांना सांगू नका)


मूल 1



मूल 1 मोशे आणि उत्पत्ति निवडतो.

मूल 2 परमेश्वराची तलवार निवडतो, हा कार्ड एकट्याने खेळल्या जाऊ शकतो.

मूल 2







मोशे: 100 नम्रता
उत्पत्ति: जर तो जिंकला तर, त्याला त्याच्या फेकण्याच्या गड्डीतून 3 कार्ड परत मिळतील.

परमेश्वराची तलवार सर्व फेऱ्या जिंकेल.




**100 नम्रता**

(त्याला असे वाटते कि तो जिंकणार)

## समाप्ती

जेव्हा दोघांपैकी कोणत्याही एका खेळाडूचे कार्ड संपतात तेव्हा खेळ समाप्त होतो. सर्वात अधिक फेर जिंकणारा मुलगा खेळ जिंकतो! मुलांना वेगळे प्रतिस्पर्धी निवळून परत खेळायला सांगा.

# खेळासाठी प्रश्न.

1. “जर तुमची बहिण तुम्हाला खोटे बोलण्यास सांगत असेल, तर कोणता वीर तुम्हाला मदत करेल?” (प्रामाणिकपणा)
2. “तुमचा एक मित्र तुमच्याकडे येतो आणि तुम्हाला सांगतो कि तुम्ही काही तरी चुकीच करत आहात, आणि तुम्हाला माहित आहे कि तुम्ही चुकत आहात, आणि तुम्हाला त्याची जाणीव करून त्यासाठी क्षमा मागण्याची गरज आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
3. शाळेत तुमचे वर्गमित्र तुमची थट्टा करीत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
4. तुमचे वडील तुम्हाला गाडी धुवायला सांगतात आणि तुम्हाला तसे करण्याची इच्छा नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञापालान)
5. तुम्ही दुकानात गेला आणि काही खाद्यपदार्थ विकत घेतल्यानंतर, दुकानदाराने तुम्हाला जास्त पैसे परत केले. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (प्रामाणिकपणा)
6. शाळेत तुमच्या वर्गमित्रांपैकी एकजण जिन्यावरून खाली पडला आणि सर्वांनी त्याची थट्टा केली. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
7. एकदा एका मुलीने तुम्हाला एक भेट दिली जी तुम्हाला आवडली नाही, परंतु तिने तुम्हाला ती खूप प्रेमाने दिली. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
8. तुमचे काका तुम्हाला बियर चा एक गिलास देतात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
9. शाळेत, तुमचे वर्गमित्र तुम्हाला सांगतात की तुम्ही तेथे ख्रिस्ती होऊ शकत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
10. तुमची बहीण तुमची आवडती खेळणी तोडते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
11. तुमच्या वडिलांनी तुम्हाला सांगितले की देव तुमच्यावर प्रेम करत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
12. तुमच्या आईवडिलांनी तुम्हाला तुमच्या चांगल्या मित्राशी खेळण्यासाठी नकार दिला कारण तो वाईट माणूस आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
13. तुमचे पाळक तुम्हाला त्यांच्यासोबत सुवार्तेसाठी जाण्यास सांगत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
14. रात्रीच्या जेवणाची वेळ आहे आणि तुमच्या कुटुंबाकडे केवळ आपल्यासाठी पुरेसे अन्न आहे, परंतु तुमच्या घरी पाहुणे येतात आणि त्यांना अन्न देणे आवश्यक आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
15. तुमचा पाळक तुम्हाला उपवास ठेवायला सांगतो, परंतु त्याच दिवशी तुम्ही उपवास करत असतांना तुमच्या आईने तुमचे आवडते जेवण तयार केले. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
16. तुमची आई तुम्हाला न आवडणारे जेवण बनवते आणि म्हणते कि तुम्हाला निरोगी होण्यासाठी ते खाणे आवश्यक आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
17. तुमची आई तुम्हाला आंघोळ करायला सांगते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
18. शाळेतील एक मुलगी अडखळते तुमच्या कपड्यांवर सोडा पाडते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
19. तुम्ही रस्ता ओलांडून जात आहात आणि तुम्ही बघता कि एक स्त्री किरणाच्या अनेक पिशव्या घेऊन जात आहे आणि ती त्यांना पाडणार आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
20. तुमच्या आईने तुम्हाला अशा मुलाच्या घरी जाण्यास सांगितले आहे जो तुम्हाला आवडत नाही आणि ज्याला तुम्ही भेटवस्तू देऊ शकत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
21. वर्गातला एक मुलगा तुमच्या वहीवर पेनानी काही तरी लिहतो आणि तुम्ही बदला घेऊ इच्छित आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
22. तुमची बहीण नेहमीच तुमच्याशी वाईट वागवते आणि तुम्हाला दुःखी करते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
23. तुमचा रविवार शाळा शिक्षक नेहमी तुम्हाला शिस्त लावतो आणि त्याचा तुम्हाला राग येतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
24. एका दिवस शाळेत तुमच्या मित्राने तुम्हाला दुसऱ्या विद्यार्थ्यांचे दप्तर चोरी करण्यास सांगितले. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (प्रामाणिकपणा)
25. तुमच्या काकूने तुम्हाला नेहमीच गैरवर्तन केल्याबद्दल शिक्षा दिली आहे, म्हणून तुम्हाला ती आवडत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
26. एक दिवस तुम्ही विचार करता की देव तुम्हाला एखादी अशी गोष्ट करण्यास सांगत आहे जी करण्याची तुमची इच्छा नाही आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
27. दुसरा मुलगा तुम्हाला सिगारेट देतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
28. चर्चमधील लोक तुम्हाला म्हणतात कि तुम्ही आळशी आहात आणि तुम्ही ते स्वीकारू इच्छित नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
29. एक मित्र तुम्हाला तुमच्या पालकांकडून पैसे चोरण्यासाठी सांगतो, आणि जर तुम्ही तसे केले नाही तर तो तुमचा मित्र राहणार नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
30. तुमच्या शाळेच्या शिक्षकाने तुम्हाला सांगितले की तुम्ही माकडा पासून आलात, तर देवापासून नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
31. शिक्षकाने तुम्हाला अयोग्य गुण दिले आणि तुमच्या पालकांना तुमच्यावर विश्वास नाही आहे आणि ते तुम्हाला शिक्षा करणार आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
32. तुमच्या ओळखीच्या व्यक्ती ने तुम्हाला सांगितले की तुम्ही खूप कुरूप आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
33. तुम्ही तुमच्या बहिणीला काहीतरी वाईट म्हटले आहे आणि तुम्हाला माहिती आहे की तुम्हाला माफी मागणे आवश्यक आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
34. तुमचे पाळक तुम्हाला स्तुती गटात सामील होऊ देणार नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
35. शाळेत तुमचे शिक्षक कधीही तुमची प्रशंसा करत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
36. तुमच्या आईने तुम्ही जे केले नाही त्यासाठी तुम्हाला दोषी ठरविले. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
37. जेव्हा तुमची आजी तुम्हाला भेटायला आली तेव्हा तिने तुमच्या भावांसाठी भेटवस्तू आणल्या, पण तुमच्यासाठी नाही. तुम्हाला माहित आहे की तुम्ही तिला माफ केले पाहिजे आणि विसरलात पाहिजे, कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
38. तुम्ही बसमध्ये प्रवास करत आहात आणि एक वृद्ध स्त्री बसमध्ये चढते. तुमच्याकडे एक बसायची जागा आहे आणि तिच्याकडे नाही आहे, कोणता वीर तुझी मदत करेल? (मन/हृदय)
3 9. तुम्ही शाळेत खेळत चालत असतांना पडता. तुमचे सर्व वर्गमित्र तुमची थट्टा करतात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
40. शाळेत सर्वजण खेळत होते, आणि तुम्ही त्यांच्यासोबत खेळू शकाल का असे त्यांना विचारले. तुमच्या वर्गमित्रांनी असे म्हटले की तुम्ही त्यांच्याबरोबर खेळू शकत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
41. तुम्ही एका मुलाला एका लहान मुलीला मारतांना बघता. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
42. प्रत्येकाकडे स्वतःची कात्री असण्यासाठी शाळेत पुरेश्या कात्री नाहीत. तुम्ही कात्री वापरत आहात आणि एक वर्गमित्र ती तुमच्याकडून घेतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
43. एका मुलीला तुम्ही आवडता आणि तुम्ही तिचे चुंबन घेऊ इच्छिता. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (प्रामाणिकपणा)
44. तुम्ही देवाला एक सायकल मागत आहात आणि तुम्हाला ती मिळाली नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
45. तुमच्या आईने तुम्हाला दुकानात जाण्यास सांगितले आणि तिने तुम्हाला 50 रुपये दिले आणि तुम्हाला उरलेले पैसे मागण्यास विसरली. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
46. शाळेतील तुमचा शिक्षक विचारतो की सर्वात हुशार मुलगा कोण आहे. तुम्ही सर्वात हुशार आहात, परंतु आपल्याबद्दल बढाई मारणे चुकीचे आहे हे तुम्हाला ठाऊक आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
47. एक दिवस तुम्ही रस्त्यावर चालत असतांना तुमच्या समोरच्या एका माणसाने आपले पैसे ठेवण्याचे पाकीट पडले आणि ते त्याच्या लक्षात आले नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (प्रामाणिकपणा)

48. तुमच्या आजीने तुम्हाला तिच्या साठी दुपारचे जेवण आणण्यासाठी बाहेर जायला सांगितले आणि तुम्ही तिला जे पाहिजे ते आणले नाही म्हणून ती तुमच्यावर रागावली. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
49. तुमचे आई वडील तुम्हाला तुमच्या काकू कडे सोडतात जी तुम्हाला आवडत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
50. तुमची बहिण तुमच्यापेक्षा मोठी आहे आणि ती नेहमी तुमची थट्टा करते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
51. तुमची बहिण तुमची आई असल्यासारखी तुम्हाला आज्ञा करते आणि तुम्हाला ती आवडत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
52. तुमची आई तुम्हाला सांगते की देव तुमच्यावर प्रीती करतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
53. तुमच्या पालकांनी तुम्हाला असा विश्वास ठेवण्यास सांगितले आहे कि सर्वकाही शक्य आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
54. तुमच्या शिक्षकाने तुम्हाला चर्च साफ करण्यामध्ये मदत करण्यास सांगितले. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
55. तुमच्या पालकांनी तुम्हाला खोली स्वच्छ करण्यासाठी सांगितले, पण तुम्हाला ते करायचे नाही आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
56. एक मित्र तुमची बाइक उधार घेऊ इच्छितो, परंतु तुम्ही त्याला ती देऊ इच्छित नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
57. तुम्हाला रस्ता पार करण्याची घाई आहे, पण व्हीलचेअरमध्ये एक महिला आहे आणि ती तुमच्याकडून मदत मागत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
58. तुमच्या पालकांना तुम्हाला परीक्षेत उत्तम गुण मिळाल्याबद्दल तुम्हाला बक्षीस द्यायचे आहे, परंतु तुम्हाला माहित आहे कि तुम्ही परीक्षेत फसवणूक केली आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
59. तुमच्या शिक्षकाने तुम्हाला एका श्रेणी प्रकल्पासाठी एका गटात ठेवले आहे. तुमच्या गटाचा एक सदस्य तुमचा वर्गमित्र आहे जो नेहमी तुमच्याशी विनोद करतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
60. तुमच्या वडिलांनी तुम्हाला नवीन नोकरी शोधण्यासाठी प्रार्थना करण्यास सांगितले आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
61. तुमचे वडील तुम्हाला असे काही करण्यास प्रवृत्त करतात जे तुम्हाला आवडत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
62. तुमच्या शाळेतील शिक्षक तुम्हाला सांगतो की पवित्र शास्त्र जे म्हणते ते खोटे आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
63. तुमचे पाळक तुम्हाला सांगतात की तुम्ही चर्चच्या कार्यक्रमात जाऊ शकता जेव्हा कि तुमच्या पालकांनी तुम्हाला म्हटले कि तुम्ही जाऊ शकत नाही, परंतु तुम्हाला माहीत आहे की देवाने तुमच्या पालकांना तुमच्यावर पहिला अधिकार दिला आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
64. तुमचे पालक तुम्हाला चर्चच्या कार्यक्रमात जाऊ देणार नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
65. तुमच्या पालकांनी तुम्हाला शिक्षा केली आणि तुम्हाला सांगितले की तुम्ही घरा बाहेर जाऊ शकत नाही, परंतु तुम्ही एकटे घरी आहात, आणि तुमचे मित्र येऊन तुम्हाला बाहेर खेळायला बोलवत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
66. जेव्हा तुम्ही एका दुकानात गेले होते तेव्हा एका मुलाने तुम्हाला अपमानित केले, तुम्हाला माहित आहे कि तुम्ही प्रतिउत्तर देऊ नये, परंतु तुम्ही खूप रागावलेले आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
67. तुमची एक खूप महत्वाची परीक्षा आहे आणि तुम्ही त्यासाठी अभ्यास केला नाही आहे आणि तुम्हाला माहित आहे कि तुम्ही परीक्षा देत असतांना फसवणूक करू शकता. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
68. तुम्ही तुमच्या शाळेच्या गटातील एकमेव सदस्य आहात जो सर्वकाही करत आहे जेव्हा कि गटातील सार्व सदस्यांनी ते केले पाहिजे, आणि तुम्हाला तुमच्या वर्गमित्रांना कामात मदत करण्यासाठी सांगायचे आहे. (दृढता)
69. शाळेतील एक मुलगा म्हणतो की तुम्ही खोटे आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
70. तुमचे वर्गमित्र एखाद्या हरवलेल्या गोष्टीसाठी तुम्हाला दोष देतात आणि प्रत्येकजण म्हणतो की तुम्ही चोर आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
71. तुमच्या आईने तुम्हाला सांगितले की तुम्ही चुकीचे आहात आणि तुम्ही तुमची चूक स्वीकारली पाहिजे आणि दुरुस्त केली पाहिजे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
72. तुमची आई तुम्हाला सांगते की ती तुमच्यावर प्रीती करते आणि तुम्हीही तिच्यावर प्रेम करायला पाहिजे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
73. तुमचा मित्र तुम्हाला असे काहीतरी खायला सांगतो जे तुम्हाला माहित आहे कि तुम्ही खावू नये. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
74. तुमचे कुटुंब घर विकत घेण्याची वाट पाहत आहेत, तोवर तुम्हाला तुमच्या आजीच्या घरी राहयचे आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
75. तुमच्या पालकांची इच्छा आहे कि तुम्ही त्यांच्यासाठी दुकानात जावे पण बाहेर पुष्कळ गर्मी आहे आणि दुकान बरेच लांब आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
76. तुम्हाला माहित पडते की तुमच्या भावाने तुमच्या वडिलांचे पैसे चोरले आहेत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
77. तुमच्या वडिलांची इच्छा आहे कि तुम्ही कचरा बाहेर काढावा परंतु बाहेर अंधार आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
78. तुम्ही तुमच्या मित्रांबरोबर बाहेर असतांना दुकानातून काही तरी चोरण्याचे धाडस करता. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
79. तुमच्या शाळेतील शिक्षक तुम्हाला सांगतात की देव अस्तित्वात नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
80. तुम्ही तुमच्या चांगल्या शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसाठी प्रार्थना करीत आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
81. तुमच्या मित्रांनी तुम्हाला तुमच्या शेजाऱ्याच्या झाडांचे फळ चोरण्यास सांगितले आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
82. तुमच्या मित्रांची इच्छा आहे कि तुम्ही तुमच्या शेजाऱ्याच्या दरवाजाची घंटी वाजवून पळून जावे, परंतु तुमच्या पालकांनी तुम्हाला हे करण्यास नकार दिला आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
83. तुमचा शिक्षक तुम्हाला एक विशिष्ट पुस्तक वाचण्यास सांगतो, परंतु तुम्हाला एक वेगळी पुस्तक वाचायची आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
84. तुमच्या आईने तुम्हाला तिच्यासाठी प्रार्थना करण्यास सांगितले आहे कारण तिचे डोके दुखत आहे आणि ती तुम्हाला सांगते की देव तिला प्रार्थनेद्वारे बरे करेल. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
85. तुमच्या शाळेतील एक मुलगा नेहमी दुःखी असतो कारण त्याच्याकडे जेवण नाही आणि त्याच्याकडे पैसे देखील नाहीत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
86. चर्चमध्ये तुमच्या पाळकांनी तुम्हाला मुलांना शिकवण्यात मदत करण्यास सांगितले आणि तुम्हाला खात्री नाही आहे की ते तुमच्याकडे लक्ष देतील. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
87. तुमच्या शाळेतील लोकांनी तुम्हाला एका अनाथआश्रमात नेले हे यासाठी कि तुम्हाला हे दिसावे कि तिथले मुलं कशा प्रकारे एकटे राहतात आणि मग ते तुमच्या गटाला ह्या मुलांची मदत करण्यास सांगतात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
88. तुमच्या पदवीदान समारंभासाठी तुम्हाला काळा पँट घालावा लागेल. तुमचे पालक तुम्हाला नवीन पँट विकत घेऊन देऊ शकत नाहीत, म्हणून तुम्ही तुमच्या चुलत भावाकडून उसणे घेतले पाहिजे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
89. तुम्ही काहीही काम केलेले नाही आहे तरी तुमचा एक वर्गमित्र त्याच्या प्रकल्पामध्ये तुमचे नाव जोडू इच्छितो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
90. तुम्ही तुमच्या चर्चमध्ये क्रियाकलापांमध्ये मदत करण्यासाठी गेला आणि त्यांनी तुम्हाला काहीही करण्यास सांगितले नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
91. शाळेत एक मुलगा तुमचा डब्बा त्याला देण्यास तुम्हाला सांगतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
92. एक दिवस तुम्ही तुमच्या मित्राला पाणी मागता, पण तो तुम्हाला काहीही देत नाही. तुम्ही हे स्वीकारले पाहिजे की ते पाणी त्याच्या मालकीचे आहे आणि तो आपल्याला ते देऊ इच्छित नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)

93. एक वर्गमित्र जो खूप अस्वच्छ राहतो आणि ज्याच्या अंगाचा खूप घाण वास येतो तो तुमच्या गटात सामील होऊ इच्छितो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
94. एक दिवस रस्त्यावर एक मुलगा तुम्हाला मादक पदार्थ देतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
95. वर्गात एक मुलगी टेबलवर तिचे पैसे विसरते आणि तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणालाही ते कळत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
96. तुमची शिक्षिका वर्गात काहीतरी चुकीचे शिक्षण देत आहे, ती जे काही सांगते ते चुकीचे आहे आणि प्रत्येकजण तिच्यावर हसतो, पण तुम्ही काय करावे हे तुम्हाला माहिती नाही आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
97. तुमचे वर्गमित्र तुम्हाला भित्रे असे म्हणतात कारण तुम्हाला मुलींबरोबर बाहेर जायला आवडत नाही, पण तुम्हाला माहीत आहे की तुम्ही एका मुलीला भेटण्याच्या योग्य वेळेची वाट पाहत आहात, जिला देवाने तुमच्यासाठी निवडले आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
98. शाळेत प्रत्येकजण दुसऱ्याच्या गृहपाठांची कॉपी करतो आणि तुम्ही आजचे तुमचे गृहकार्य केले नाही आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
99. तुमच्या आजूबाजूच्या इतर मुलांनी चुकीची वागणूक केली आहे आणि तुमच्या वडिलांनी तुम्हाला यापुढे खेळायला नकार दिला आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
100. ज्या मुलाला तुम्ही नेहमी जोडीदारांशी भांडतांना पहिले आहे आणि तुम्हाला माहित आहे कि तो खोडकर आहे, तो मुलगा तुमचा मित्र होण्यासाठी विचारतो आणि तुमच्याकडून मदत मागतो कारण त्याला एकटे वाटत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
101. एक मुलगा तुम्हाला भेकड म्हणतो कारण तुम्ही तुमच्या वर्ग मित्रांनसोबत भांडत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
102. एक दिवस तुमच्या मंडळीतील एक पुढारी तुम्हाला म्हणतो कि देव कधीही तुमचा वापर करून घेणार नाही आणि तुम्हाला हे ऐकून वाईट वाटते, कारण अस वाटते कि देवाने तुम्हाला कशाच साठी बोलावलेले नाही आहे? (विश्वास)
103. तुमची शिक्षिका तिच्या तोंडातून तिची चॉकलेट काढते आणि तुम्हाला खायला देते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता) हीहीही!
104. चर्चच्या पाळकाने तुम्हाला आठवड्यातून एकदा चर्चला जाण्यासाठी सांगितले आणि तुम्हाला असे करण्यास आवडत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
105. रविवार शाळेत तुमचा शिक्षक चॉकलेट देतो, परंतु तुमच्यापेक्षा एक लहान मुलाला त्यातली एकही चॉकलेट मिळत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
106. तुमच्या आईने तुम्हाला सांगितले की तुमचे वडील तुमच्यावर प्रेम करत नाहीत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
107. तुमच्या मित्रांची इच्छा आहे कि तुम्ही त्यांच्याबरोबर पेंट भित्तिचित्र बघण्यास जावे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
108. तुमच्या मित्रांची इच्छा आहे कि तुम्ही त्यांच्याबरोबर खिडक्या तोडाव्या. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
109. तुमच्या रविवार शाळेच्या शिक्षकाने तुम्हाला सांगितले की तुम्ही एक चांगला मुलगा आहात, परंतु तुम्हाला काही वर्तन सुधारण्याची गरज आहे. तुम्ही त्यांचे निरीक्षण स्वीकारू इच्छित नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
110. तुमचा मित्र तुम्हाला तुमच्या शेजाऱ्याला त्रास देण्यासाठी आमंत्रित करतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
111. तुम्ही शोधून काढले की तुमचा सर्वात चांगला मित्र तुमच्या दुपारच्या जेवणाच्या पैशाची चोरी करतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
112. तुमचे पाळक तुम्हाला आजाऱ्यासाठी प्रार्थना करण्यासाठी हॉस्पिटलमध्ये जाण्यास सांगत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
113. तुमच्या आईने तुम्हाला तुमच्या काकू ला भेटायला सांगितले, जी तुम्हाला आवडत नाही आणि नेहमी तुम्हाला रागवत राहते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
114. तुमच्या आईला वाईट वाटत आहे आणि तिने तुम्हाला तिच्यासाठी प्रार्थना करायला सांगितले आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
115. तुमच्या आईने तुमच्या भावाला तुमच्यापेक्षा जास्त अन्न दिले पण ती स्पष्ट करते की तो मुलगा आहे म्हणून तो तुमच्यापेक्षा जास्त खातो आणि तुम्ही तुमच्या आईच्या स्पष्टीकरणास स्वीकारले पाहिजे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
116. तुमचा सर्वात चांगला मित्र तुम्हाला परीक्षेत फसवणूक करण्यामध्ये त्याची मदत करण्या सांगतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
117. तुम्ही एका कार्यक्रमात गेलात आणि तुमच्या खेळण्या सर्वात जुन्या होत्या, परंतु तुम्हाला माहित आहे की तुमचे पालक नवीन खेळण्या विकत घेऊ शकत नाहीत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
118. फुटबॉलचा खेळ खेळत असतांना तुमचे मित्र तुम्हाला सोबत घेत नाहीत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
119. एका मित्र तुम्हाला असे सांगतो की परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी तुमच्या शिक्षकांच्या टेबलमधून उत्तरे चोरणे आवश्यक आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
120. काही मुलं पिल्लांना मारत आहेत आणि तुम्ही तिथे आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
121. दुकानाच्या बाजूलाच 20 रुपये पडलेले आहेत आणि कोणीही ते पाहिले नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
122. तुमचे वडील तुम्हाला तुमच्या पाळीव प्राण्याला जेवण देण्यास सांगतात, परंतु तुम्हाला आवडणारा टीव्ही वरचा कार्यक्रम सुरू होणार आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
123. तुमच्या आईने तुम्हाला चर्चमध्ये स्नानगृह स्वच्छ करण्यास मदत करण्यास सांगितले आहे, परंतु तुम्हाला ते नाही करायचे आहे कारण ते गलिच्छ आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
124. टीव्हीवर तुम्ही एका माणसाला असे म्हणतांना ऐकत आहात की देव अस्तित्वात नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
125. तुमचे संपूर्ण कुटुंब बाहेर चालण्यास जाते आणि त्यांना एक अपंग व्यक्ती जेवण करण्यास मदत मागतांना दिसतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
126. चर्चमध्ये, एक वर्गमित्र तुमच्याविषयी खोटे बोलतो आणि तुम्ही सत्य समोर येईपर्यंत प्रतीक्षा करण्याशिवाय काहीच करू शकत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
127. तुमच्या भावाचा मित्र तुमच्या घरी झोपतो आणि तुमचे आई-वडिल तुम्हाला तुमचा पलंग त्याला देण्यास सांगतात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
128. आपल्या कुटुंबात तुम्ही नवीन घरासाठी प्रार्थना करीत आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
129. तुमचे आजोबा तुम्हाला त्यांच्या घराचे आवारा स्वच्छ करण्यास मदत करण्यास सांगतात, पण ही तुमची उन्हाळी सुट्टी आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
130. तुम्ही तुमच्या शेजारच्या मुलाला किराणा दुकानात चोरी करत असतांना पाहता. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
131. तुमच्या एका वर्गमित्राकडे त्याच्या नाश्त्याची खरेदी करण्यासाठी पुरेसा पैसा नाही आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
132. चर्चमध्ये उपदेश करण्याची तुमची पाळी आहे आणि तुम्ही चांगले करण्याबद्दल चिंताग्रस्त आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
133. तुमचे अनेक मित्र परवानगीशिवाय तुम्हाला दुकानात नेऊ इच्छित आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
134. तुम्ही तुमचे गृहकार्य पूर्ण करू इच्छित नाही कारण तुम्ही आळशी आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
135. प्रत्येकजण तुमच्या मित्राच्या पार्टीत चांगले कपडे घालून येणार आहे, पण तुमच्या पालकांना तुम्हाला चांगले कपडे विकत घेऊन देता येणार नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
136. तुम्ही एका लहान मुलाला कमी पैसे देत असलेल्या दुकानदाराकडे बघत आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
137. एक वर्गमित्र तुम्हाला दुसऱ्या मुलाला पाडण्यास सांगतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
138. शनिवारची सकाळ आहे आणि तुमचे आजी-आजोबा तुम्हाला भेटायला येणार आहेत. तुमच्या पालकांनी तुम्हाला ते येण्याआधी तुमची खोली स्वच्छ करण्यास सांगितले आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
139. तुमच्या मित्रांची इच्छा आहे कि तुम्ही प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना त्रास द्यावा. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)

140. तुमचा भाऊ तुम्हाला सांगतो की तुमच्या पालकांना तुम्ही नकोशे आहात कारण ते तुम्हाला सतत रागवत असतात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
141. एक मित्र तुम्हाला त्याच्याबरोबर त्या ठिकाणी जाण्यास सांगतो जिथे अनेक प्राणी आहेत आणि तुम्हाला प्राणी आवडत नाहीत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)

142. तुम्ही चर्चमधील वर्गात उशिराने जाता कारण तुम्हाला वेळेचे भान नसते आणि जेव्हा तुमचे शिक्षक तुम्हाला उशिराने येण्याचे कारण विचारतात तेव्हा तुम्हाला खोटे बोलावेसे वाटते? (प्रामाणिकपणा)
143. चर्चमध्ये एक गायन स्पर्धा आहे आणि एका सहभागी ने चांगले गायन नाही गायले आणि प्रत्येकजण त्याची थट्टा करत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
144. मुलांच्या सभेत एका मुलीने तिच्या भावासाठी प्रार्थना करण्यास सांगितले जो आजारी आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
145. तुमचे मित्र तुम्हाला नदीत पोहण्यासाठी बोलवत आहेत, पण तुमच्या वडिलांनी तुम्हाला हे सांगितले की ते खूप धोकादायक आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
146. तुमच्या पालकांनी तुम्हाला आपल्या लहान भावांची काळजी घेण्यास सांगितले, पण तुमचा धाकटा भाऊ तुमचं ऐकत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
147. तुमचा शिक्षक तुम्हाला बोर्ड मिटविण्यास सांगतो, परंतु तुम्हाला ते करणे आवडत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
148. तुमचा मित्र तुम्हाला तुमच्या शेजाऱ्याची खोडी करण्यास बोलवत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (प्रामाणिकपणा)
149. तुम्हाला एक पाकीट सापडलं आणि जेव्हा तुम्ही ते उघडले तेव्हा तुम्हाला त्याच्या मालकाची माहिती मिळाली. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (प्रामाणिकपणा)
150. तुम्ही तुमच्या समोर एका वृध्द माणसाला खूप भारी सामान घेऊन जातांना बघता. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
151. शाळेच्या दुकानात ते तुम्हाला लहान मुलांना देईपर्यंत प्रतीक्षा करण्यास सांगतात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
152. तुम्हाला वाटते की घेण्यापेक्षा देणे हे चांगले आहे; पण तुमचे मित्र तुम्हाला अन्यथा सांगतात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
153. तुमचे मित्र तुमच्यावर या रविवारी चर्चमध्ये न जाण्याचा दबाव आणत आहेत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
154. तुमच्या शेजाऱ्याचा चेंडू तुमच्या आवारात पडला, पण तो कोठे गेला हे त्यांना माहित नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
155. तुमच्या मित्राच्या परिवाराकडून त्यांच्याकडे जे काही होते ते सर्व लुटून घेण्यात आले आहे, आणि आता त्यांना मदतीची आवश्यकता आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
156. तुमचे वडील तुम्हाला टीव्ही बंद करण्यास सांगतात, कारण टीव्हीवर दाखवत असलेला कार्यक्रम तुमच्यासाठी वाईट आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
157. तुमच्याकडे चर्चमध्ये बसण्याची एक आरामदायी जागा आहे, परंतु तुम्हाला तुमची जागा दुसऱ्या कोणाला तरी देण्यास सांगितले जाते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
158. तुम्हाला खात्री आहे की तुम्ही कोणीतरी मूल्यवान आहात, कारण पवित्र शास्त्र असे सांगते; पण प्रत्येकजण तुम्हाला सांगतो की तुम्ही निरर्थक आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
159. तुमच्या मित्रांनी तुम्हाला लैंगिक दृश्यांसह चित्रपट पहाण्यासाठी आमंत्रित केले आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
160. शाळेत तुम्हाला कोणाचंतरी हरवलेलं पाकीट सापडते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
161. तुमच्या आईवडिलांनी तुम्हाला आपल्या सर्वात लहान बहिणीची काळजी घ्यावी अशी विनंती केली आहे, परंतु तुम्हाला तुमच्या मित्रांसह बाहेर जायचे आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
162. तुम्ही आपल्या मित्राजवळ वर्गात बसता, परंतु तुमच्या शिक्षकाने तुम्हाला दुसरीकडे बसण्यास सांगितले आहे. कोणते वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
163. तुम्ही आजारी आहात, आणि तुम्ही तुमच्या पाळकाला तुमच्यासाठी प्रार्थना करण्यास सांगत आहात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
164. तुमच्या मित्रांकडे प्रौढ मासिके आहेत आणि ते तुम्हाला ते पाहण्यास आमंत्रित करीत आहेत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
165. कोणीतरी तुम्हाला पायरेट केलेले चित्रपट खूप स्वस्तात देत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
166. तुम्ही तुमच्या शेजाऱ्याला कार लोटत असतांना पहात आहात कारण ती सुरु होत नाही आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
167. तुम्ही तुमच्या भावांसह टीव्ही पहात आहात आणि तुमच्या आईने तुम्हाला दुकानामध्ये जाण्यास सांगितले आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
168. तुम्ही तुमच्या चेंडूने खेळत होता आणि तुम्ही तुमच्या शेजाऱ्याच्या झाडांचे नुकसान केले. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
169. तुमच्या पवित्र शास्त्र वर्गात तुमचा शिक्षक तुम्हाला एका आजारी व्यक्तीसाठी प्रार्थना करण्यास आमंत्रित करतो. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
170. तुमच्या मित्रांची अशी इच्छा आहे कि तुम्ही त्यांना न आवडणाऱ्या सहपाठीला त्रास द्यावा. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
171. तुमच्या आईने टेबलावर काही नाणी सोडल्या आहेत आणि आता ती घरी नाही आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
172. तुमची लहान बहीण अंगणातील झाडातून फळ काढू इच्छित आहे, परंतु ती त्या पर्यंत पोहोचू शकत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
173. तुमची आई तुम्हाला कचरा काढून घेण्यास सांगते, पण तुम्हाला ते नाही करायचे आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
174. तुम्हाला आणि तुमच्या लहान बहिणीला दोघांनाही चॉकलेट पाहिजे आहे पण फक्त एकच तुकडा बाकी आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
175. तुमचे वडील तुम्हाला सांगतात की ते बाहेर तुमच्यासोबत खेळायला येणार आहेत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
176. तुमच्या मित्रांनी तुम्हाला तुमच्या शेजाऱ्याच्या आवारात खेळण्यासाठी आमंत्रित केले आहे, परंतु तुम्हाला माहित आहे की त्याला ते आवडत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
177. तुमच्या मित्राकडे बऱ्याच व्हिडिओ गेम आहेत आणि तुम्ही ते चोरण्या बद्दल विचार करता. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
178. तुम्ही पाहता कि तुमची आई अंगणातील मोठे खंबे एकटीच हलवत आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
179. तुमच्या आईने तुम्हाला सांगितले की तुम्ही तुमचे गृहकार्य पूर्ण होईपर्यंत खेळू शकत नाही, परंतु तुमचे मित्र तुम्हाला बोलविण्यासाठी आले आहेत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
180. तुमच्या वडिलांनी तुम्हाला काही तरी करायला सांगितले होते आणि तुम्ही ते केले नाही, आता तो तुम्हाला रागवत आहेत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
181. तुमची आजी हॉस्पिटलमध्ये आहे, परंतु प्रत्येकजण तुम्हाला सांगतो की ती ठीक होईल. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
182. एक अनोळखी माणूस तुमच्याकडे येतो आणि तुम्हाला त्याच्याबरोबर जाण्यास सांगतो कारण त्याच्या घरी तुमच्या साठी एक बक्षीस आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
183. फ्रीजमध्ये केकचा एक तुकडा आहे, तुम्ही तो घेऊ इच्छित आहात, परंतु तुम्हाला हे माहित आहे कि तो तुमच्या भावासाठी आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
184. एक वृद्ध महिला किराणा दुकानातून भारी पिशवी घेऊन जात आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
185. तुमच्या पालकांनी तुम्हाला टीव्ही बंद करण्यासाठी आणि अंथरुणावर जाण्यासाठी एक तास दिला आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)

186. एक वर्गमित्र तुम्हाला त्रास देत आहे, परंतु तुम्ही त्याच प्रकारे प्रतिसाद देऊ इच्छित नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
187. तुमचे मित्र म्हणतात की तुम्ही चर्चला जाऊ नये. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
188. तुमच्या मित्रांची इच्छा आहे कि तुम्ही एका सहपाठीच्या दप्तरामध्ये एक प्राणी टाकावा. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
189. तुमच्या घरात कोणीतरी रंग्कांड्याचा एक डब्बा हरवला आहे, तो कोण आहे हे तुम्हाला माहित नाही आणि तुम्हाला त्यांची आवश्यकता आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
190. तुमच्या शाळेतील सर्वात लहान मुलगा स्वतः झुल्यावर चढू शकत नाही. तुम्ही त्याला चढण्याचा प्रयत्न करतांना पाहत आहात, परंतु तो असमर्थ आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
191. तुमच्या आईने तुम्हाला सांगितले की तुम्ही तुमचे अंथरुण घडी केले पाहिजे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
192. तुमच्या वडिलांनी तुम्हाला रागावले, पण आता ते तुम्हाला आलिंगन देऊ इच्छितात आणि तुम्हाला एक चुंबन मागत आहेत. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
193. तुमच्या मित्रांनी असे म्हटले आहे की देवाने तुम्हाला सोडले आहे, परंतु पवित्र शास्त्र असे म्हणते की दररोज देव तुमच्याबरोबर राहील. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
194. तुमचे मित्र तुम्हाला चर्चमधील घंटी वाजविण्याचा धाडस करण्यास सांगतात. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
195. तुम्ही दुकानात पैसे देत असतांना कोणाला तरी खाली पैसे पडतांना पाहता. तुमच्याशिवाय ते कोणाच्याही लक्षात येत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल?(प्रामाणिकपणा)
196. एक मुल त्या अंगणात पडतो जेथे तो खेळत होता, परंतु कोणीही त्याला मदत करत नाही. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
197. तुमची आईने तुम्हाला कारमध्ये जाताना सीटचा पट्टा घालण्याची आज्ञा दिली आहे, परंतु बर्याच मुलांनी ते केले नाही असे तुम्हाला दिसते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
198. तुमच्या वडिलांनी तुम्हाला सांगितले कि तुम्ही तुमच्या शेजाऱ्याला त्या गोष्टी साठी क्षमा मागितली पाहिजे ज्याच्यामुळे त्याला त्रास झाला आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
199. तुम्ही चांगले अंक मिळवू शकत नाही असे तुम्हाला वाटते, परंतु तुमची आई तुम्हाला प्रार्थना करण्यास सांगते आणि देवाकडे बुद्धीची मागणी करण्यास सांगते. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)
200. तुम्ही ज्या चित्रपटाची वाट पाहत होता, तो आता टीव्हीवर लागणार आहे, परंतु तो तुमच्या बायबल वर्गाच्या वेळेवर लागणार आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (दृढता)
201. एका मासिकाच्या दुकानात तुम्हाला पाहिजे असलेली एखादी मासिका तुम्हाला दिसली परंतु तुम्ही ती घेऊ शकत नाही. तुम्ही मासिका चोरी करण्याबद्दल विचार करता. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (प्रामाणिकपणा)
202. तुमची बहीण तुमच्याकडे रडत आली आहे आणि तुमच्याकडून मदत मागत आहे कारण तिच्या पाळीव प्राण्यांला दुखापत झाली आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (मन/हृदय)
203. तुमच्या पालकांनी तुम्हाला अनोळखी लोकांशी बोलण्यास मनाई केली आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (आज्ञाधारकपणा)
204. तुमच्या भावाने गाडी खूप घाण केली आहे, परंतु तुमच्या वडिलांनी तुम्हाला ती साफ करण्यास सांगितले आहे. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (नम्रता)
205. पवित्र शास्त्र म्हणते की देव तुमच्या सोबत आहे आणि तो नेहमीच तुमची मदत करेल. कोणता वीर तुम्हाला मदत करेल? (विश्वास)